**प्रकल्प प्रवर्तक मे. रामा एंटरप्रायझेस, सर्व्हे नं. ४८/१, ४८/२, ४८/३ए, ४८/३बी, ४९/१, ५५/१ए, गाव-होनाड, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगड, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित एपीआय आणि - एपीआय डेरिव्हेटिव्हज - १५,६००.० टीपीए क्षमता प्रकल्प उभारणी संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत-**

---

प्रकल्प प्रवर्तक मे. रामा एंटरप्रायझेस, सर्व्हे नं. ४८/१, ४८/२, ४८/३ए, ४८/३बी, ४९/१, ५५/१ए, गाव-होनाड, तालुका-खालपूर, जिल्हा-रायगड, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित एपीआय आणि - एपीआय डेरिव्हेटिव्हज - १५,६००.० टीपीए क्षमता प्रकल्प उभारणी संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी शुक्रवार, दिनांक १४ जुलै, २०२३ रोजी दुपारी ०१.०० वाजता सॅम्युअल हॉल, ४ था माळा, जुना मुंबई-पुणे हायवे (एन.एच. ४), खोपोली, जिल्हा-रायगड (४१० २०३) येथे आयोजित करण्यात आलेली होती .

श्री प्रशांत भोसले, उप प्रादेशिक अधिकारी, रायगड-१, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ ,सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४

तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी काही अपरिहार्य कारणांमुळे मा. जिल्हाधिकारी यांचे प्रतिनिधी वेळेवर येऊ शकले नाहीत याबददल दिलगिरी व्यक्त केली.

श्री. प्रशांत भोसले, उप प्रादेशिक अधिकारी, रायगड-१, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४ तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री. संदेश शिर्के, अपर जिल्हादंडाधिकारी, रायगड, अलिबाग तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री जयवंत हजारे, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री. अयुब तांबोळी, तहसीलदार, खालापूर, जिल्हा-रायगड, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, चॅनलचे प्रतिनिधी व मोठया संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मे. रामा एंटरप्रायझेस यांचा सर्व्हे नं. ४८/१, ४८/२, ४८/३ए, ४८/३बी, ४९/१, ५५/१ए, गाव-होनाड, तालुका-खालपूर, जिल्हा-रायगड, महाराष्ट्र येथे प्रस्तावित एपीआय आणि - एपीआय डेरिव्हेटिव्हज - १५,६००.० टीपीए क्षमता प्रकल्प उभारणी संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास अर्ज प्राप्त झाला.

सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित नुसार संवर्ग ए - ५ (एफ) मध्ये मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास

पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक २९-१०-२०२१ रोजी सादर केला व त्यास अर्जास भारत सरकारने ऑनलाईन मंजूरी दिनांक ०२-११-२०२१ रोजी प्रदान केली.

जिल्हाधिकारी, रायगड, यांनी कोरोना विषाणुच्या प्रादूर्भावाच्या पूर्वी जशी जनसुनावणी सामान्य पध्दतीने घेण्यात येत होती, तशीदेखील सामाजिक अंतर राखून व संबंधित नियमांचे पालन करुन जनसुनावणी येऊ शकते असे निर्देश दिले. त्यानुसार प्रत्यक्ष (Physical) पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्यास शुक्रवार , दिनांक १४ जुलै, , २०२३ रोजी दुपारी ०१. ०० वाजता मान्यता दिल्यानंतर सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई- ३७ / २०२३ ,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२३०६१४ एफटीएस ०१२१ दिनांक १४-०६-२०२३ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

१) जिल्हादंडाधिकारी, रायगड, अलिबाग, - **अध्यक्ष**
किंवा त्यांचे प्रतिनिधी
(अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा
कमी दर्जाचा नसावा)

२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई - **सदस्य**
यांचे प्रतिनिधी –
प्रादेशिक अधिकारी -रायगड,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
रायगड भवन, ६ वा मजला, सेक्टर-११,
सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४

३) उप प्रादेशिक अधिकारी, रायगड-१, - **आयोजक**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
रायगड भवन, ६ वा मजला, सेक्टर-११,
सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक अधिकारी,रायगड-१, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन, ६ वा मजला, सेक्टर-११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४ यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक दैनिक

सकाळ व कृषिवल यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत १२-०६-२०२३ रोजी जनसुनावणीबाबत प्रकाशित केली होती. त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज लोकांच्या माहितीकरीता खालील अधिसूचित कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते -

१) क्षेत्रीय कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यु सेक्रेटरिअल बिल्डिंग तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर,

२) जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड,अलिबाग,

३) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, रायगड,अलिबाग,

४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, रायगड,अलिबाग,

५) तहसीलदार, तहसील कार्यालय-खालापूर, तालुका-खालापूर, जिल्हा- रायगड,अलिबाग,

६) गट विकास अधिकारी,पंचायत समिती,तालुका-खालापूर,

जिल्हा- रायगड,अलिबाग,

७) ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय - होनाड, ग्रामपंचायत कार्यालय- आडोशी, अत्करगाव, टेंबेवाडी, ढेकू, साजगाव, सारसन, ठाणेन्हावे, जिल्हा- रायगड,अलिबाग,

७) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

८) सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण) - मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, ३रा मजला, सायन माटुंगा स्कीम रोड नं. ८, सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२

९) प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन, ६ वा मजला, सेक्टर-११, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.

१०) उप प्रादेशिक अधिकारी, रायगड-१, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन, ६ वा मजला, सेक्टर-११, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.

११) संकेतस्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई

आजतागायत उपरोक्त प्रकल्पाविषयी उप प्रादेशिक अधिकारी, रायगड-१,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नवी मुंबई यांना एकही सूचना/आक्षेप प्राप्त झालेला नाही.

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

आयोजक यांनी प्रतिपादन केले की ही समिती फक्त लोकांचे पर्यावरणविषयक मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे, नाकारणे किंवा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. आपण जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेप यांची इतिवृतात नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन

प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण मुल्यांकन अहवाल पर्यावरण, वने व हवामान बदल विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली यांना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे सादर करावयाचा असतो. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. आयोजक यांनी अध्यक्षांना प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी सादरीकरण केले. त्यांनी सांगितले की सदरहू प्रकल्पाची एकूण किंमत ५०.०० कोटी खर्च असून तर पर्यावरण व्यवस्थापनासाठी भांडवली खर्च अंदाजे - रुपये ७००.० लाख, तर आवर्ती खर्च - रुपये १३२.० लाख रुपये आहे. सदरहू प्रकल्प हा झिरो लिक्विड डिस्चार्ज प्रकल्प आहे.

सादरीकरणानंतर आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी

काही पर्यावरणविषयक आक्षेप, सूचना असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

**१) श्री संदिप तातुराम पाटील, राहणार-अत्करगाव, तालुका–खालापूर, जिल्हा–रायगड:-**

रामा एन्टरप्राईझ्सचे स्वागत. कारण गावात प्रकल्प आला तर रोजगार मिळेल. मात्र आमच्या गावात अशी परिस्थिती आहे की रोजगार दिला जातो. नंतर सहा महिन्याने त्या कामगारास ब्रेक दिला जातो. तर याबाबतीत आपल्या कंपनीचे काय धोरण राहणार आहे?

**प्रकल्प पर्यावरण सल्लागार** यांनी सांगितले की सादरीकरणात सांगितल्याप्रमाणे प्रकल्पात प्रत्यक्ष पन्नास व अप्रत्यक्ष पन्नास व्यक्तींची गरज भासणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या नियमाप्रमाणे जे शंभर कुशल व अकुशल कामगार हे स्थानिक गावातीलच राहतील. प्रकल्पात लागणारे कुशल कामगार हेही स्थानिक गावातीलच राहतील. प्रकल्प परिघातीलच व्यक्ती प्रकल्पात घेण्यात येतील. तरी गावातच उपलब्ध असणा-या कामगारांचाच उपयोग कंपनी कामासाठी करण्यात येईल.

**श्री संदीप पाटील यांनी** आक्षेप नोंदविला की सहा महिन्यांनी जो ब्रेक दिला जातो, तर तो देण्यात येणार नाही  याबाबतील धोरण सांगण्यात यावे.  जर त्या कामगाराने चूक केली, तर त्यास ब्रेक दिला किंवा कामावरुन काढले, तर त्याबाबत हस्तक्षेप करण्यात येणार नाही.  तरी येते सहा महिन्यांनी ब्रेक देणार नाही याबाबत उत्तर देण्यात यावे.

**प्रकल्पाचे अधिकारी यांनी** सांगितले की आपण उपस्थित केलेला प्रश्न अगदी योग्य आहे.  सहा महिन्याने ब्रेक हा अप्रत्यक्ष कामगारांबाबत होत असतो.  त्याबाबत त्या कामगाराची शारीरिक क्षमता, वर्तणुक,कार्यक्षमता लक्षात घेऊनच निर्णय घेण्यात येतो. अशा प्रकारचा कुठलाही अन्याय आम्ही करणार नाही.

त्यांनी पुढे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास उपरोक्त प्रकल्पास प्रदूषण न होण्साठी कडक उपाययोजना राबविण्याची सूचना करावी, कुठल्याही परिसरातील गावाला या प्रकल्पाचा त्रास होऊ नये याची काळजी घ्यावी ही विनंती.

त्यांनी प्रकल्पाचे स्वागत केले.  त्यांनी शासनास विनंती केली की प्रकल्पास परवानगी द्यावी.

२) **<u>श्री चंद्रकांत गोविंद देशमुख, राहणार-आडोशी, तालुका-खालापूर,जिल्हा-रायगडः-</u>**

हा जो रामा प्रकल्प आमच्या परिसरात कार्यान्वित होणार आहे, त्याचे सर्व ग्रामपंचायतीतर्फे स्वागत. सादरीकरणात जे

अभिवचन देण्यात आले, त्याचे पालन होईल अशी आशा आहे. वृक्षारोपणावर बराच खर्च केला जातो, पण प्रत्यक्षात त्या जागेवर गेल्यानंतर असे दिसते की तेथे वृक्षारोपण झालेले दिसत नाही. तरी सर्वांच्या आरोग्याच्यादृष्टीने सर्व पर्यावरण नियमांचे पालन करण्यात यावे. सादरीकरणात हवामानाबाबत उल्लेख आहे. परिसरातील कमाल व किमान तापमानाचा उल्लेख करण्यात आलेला आहे. मात्र आपल्याकडे कधि अती उष्णता, अती पावसाळा, अती थंडी असते. त्यावेळी आपण कमाल व किमान बाबत कसे करता, याबाबत स्पष्टीकरण देण्यात यावे. आमचा प्रकल्पास कुठलाही आक्षेप नसून प्रकल्प लवकरात लवकर सुरु व्हावा.

**प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार** यांनी सांगितले की हवामानाचा अंदाज हा आयएमडी स्टेशनवरुन घेण्यात येतो, जो की भारत सरकारचाच विभाग आहे. तर तो अंदाज हा प्रत्येक दिवसाचा नसतो, तर तो त्या मोसमाचा किंवा संपूर्ण वर्षाचा असतो. त्यामुळे हे गृहित धरावे लागते की काही घटक हे कमाल व किमान राहू शकतात.

३) **श्री शहाजी नरहरी औघे, राहणार-जिल्हा-रायगडः-**

यांनी वार्षिक जे उत्पादन दाखविलेले मेट्रीक टनमध्ये दाखविलेले आहे. मात्र त्यातील निःस्सारणचे (Disposal) टक्केवारी ही कुठेही दाखविलेली नाही. त्याचप्रमाणे त्याची विल्हेवाटीसंबंधी काहीही माहिती दिलेली नाही. म्हणजे जे

उत्पादन होणार आहे, ते सादरीकरणात दर्शविले, मात्र त्याचे जे वेस्टेज किती याचा कुठेही उल्लेख नाही.

**प्रकल्प अधिकारी यांनी** सांगितले की हा प्रकल्प संपूर्णपणे पर्यावरणाची काळजी घेणारा आहे. प्रकल्पात उत्पन्न होणारे सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्याचा प्रकल्पात पुनर्वापर करण्यात येणार आहे. प्रकल्पातील प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा एकही थेंब प्रकल्पाबाहेर सोडण्यात येणार नाही.

आपण जो घातक घन कच-याविषयी शंका विचारली, तर प्रकल्पातील घातक घन कच-याची शास्त्रीयदृष्ट्या विल्हेवाट लावण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशांनुसार घातक घन कचरा मुंबई वेस्ट मॅनेजमंटला हस्तांतरित करण्यात येईल.

**त्यावेळी श्री औघे** यांनी किती प्रमाणात घातक घन कचरा निर्माण होईल याची काहीही माहिती दिलेली नाही असा आक्षेप नोंदविला. आपल्या प्रकल्पात उत्पन्न होणारा घन कचरा हा सतत पुनर्वापर करण्यात येणार आहे. जो करता येणार नाही, तेवढाच घातक घन कचरा ही मुंबई वेस्ट मॅनेजमंटला हस्तांतरित करण्यात येईल.

**प्रकल्प अधिकारी यांनी** सांगितले की ५-६ महिन्यात ते जास्तीतजास्त ५-६% एवढेच असेल. त्यांनी त्याचा उल्लेख हा अहवालात करण्याची सूचना केली.

४) <u>**श्री नीतीन दत्तात्रय ढवळे, राहणार-अत्करगाव, तालुका- जिल्हा- रायगडः-**</u>

ही जनसुनावणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने जी जनसुनावणी आयोजित केलेली आहे, तर माझे दोन प्रश्न पर्यावरण सल्लागार यांना आहेत. त्यांनी जल प्रदूषणाबाबत काय सर्वेक्षण केले? तसेच वायू प्रदषणाचे काय सर्वेक्षण केले? हा कारखाना आमच्या रस्त्याच्या डाव्या बाजूस येत आहे. पूर्वीच्या कंपनीमुळे भूगर्भातील पाणी हे संपूर्णपणे दुषित झालेले आहे. पण आपण अहवालात सर्व चांगले रिपोर्ट दिलेले आहेत. तर माझ्या मते जल प्रदूषणाचा हा रिपोर्ट पूर्णपणे चुकीचा आहे. योग्यरित्या सर्वेक्षण करण्यात आलेले नाही.

वायू प्रदूषणाबाबत म्हणाल तर येथे ब-याच प्रमाणात वायू प्रदूषण आहे. कंपनीतील उत्पादन प्रक्रियेत बॉयलरमधून उत्पन्न होणा-या धुरावर काय प्रक्रिया करण्यात येईल? याबाबत मार्गदर्शन करावे.

**प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी** उत्तर दिले की पहिला प्रश्न हा जल प्रदूषणाचा होता. त्यांनी उत्तर दिले की आमची संस्था ही QCI Nabet मान्य पर्यावरण सल्लागार संस्था आहोत. त्याचप्रमाणे आमची प्रयोगशाळा ही भारत सरकारच्या पर्यावरण विभागाची आणि एनएबीएल मान्यता प्राप्त संस्था आहे. सर्वेक्षण करताना भूगर्भ व जमिनीवरील (सरफेस वॉटर) नमुने घेतले. पाण्याचे नमुने हे शास्त्रीयदृष्ट्या गोळा करण्यात

आलेले आहेत. त्याचप्रमाणे पाण्याच्या नमुन्याचे विश्लेषण हेसुध्दा शास्त्रीयदृष्ट्या करण्यात आलेले आहे. तर केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने पारित केलेल्या मानकांप्रमाणेच येथील प्रदूषणाची पातळी ही आढळून आलेली आहे. त्याचा उल्लेख अहवालात दिलेला आहे.

आता वायू प्रदूषणाबद्दल. तर वायू प्रदूषणाचीही पातळी ही विहित मानकांमध्येच आढळलेली आहे. नमुने तपासण्याची सयंत्रे ही आयएसओ मान्यता प्राप्त आहेत. पर्यावरण सल्लागार यांनी आवाहन केली की आपण ते रिझल्ट्स पाहू शकतात. पडताळू शकतात.

**श्री नीतीन ढवळे यांनी** सांगितले की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास सूचना आहे की त्यांनी तेथील पाहणी करावी. आमच्या येथे आडोशी गावाच्या बाजूला मानदाड अत्करगावाचा पाझर तलाव आहे. तेथील ७-८ गावे या तलावावर अवलंबून आहेत. जमीनीखालील पाणी/भूगर्भातील पाणी हे पिण्यासाठी राहिलेले नाही. येथे मूतखड्यासारख्या आजाराचे प्रमाण जास्त आहे. तर भविष्यात या कंपनीमुळे परिसरातील भूगर्भातील पाणी खराब होऊ नये याची काही शाश्वती देऊ शकतो.

**सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी** सांगितले की या प्रकल्पात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने शून्य द्रव निःस्सारणाची अट घातलेली आहे. तरी

कंपनी ईटीपी, आर.ओ., एमईई कार्यान्वित करतील. प्रकल्पातील औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रिया करुन त्याचा प्रकल्पात पुनर्वापर करण्यात येईल. तरी त्यामुळे जमिनीत पाणी मुरविण्याचा किंवा पाणी बाहेर सोडण्याचा संबंध येणार नाही. सदस्य यांनी सांगितले की सांडपाण्याची क्षमताही कमी १४.१६ घन मीटर प्रती दिन आहे. तर कंपनीच्या क्षेत्रातच ते प्रक्रिया करु शकतात.

**श्री ढवळे यांनी आक्षेप नोंदविला** की भूगर्भातील पाणी आम्ही अंघोळीसाठी घेऊ शकत नाही. आम्ही दीड कि.मी. अंतरावरुन पाणी आणलेले आहे. तेसुध्दा पाणी खराब होणार असेल, तर आम्ही पाणी कुठून आणावे?

**त्यावेळी सदस्य** यांनी सांगितले की भूगर्भातील पाण्याबाबतची तक्रार लेखी स्वरुपात करण्यात यावी. त्यावर मप्रनि मंडळाकडून पुढील कार्यवाही करण्यात येईल

**श्री ढवळे यांनी** आक्षेप नोंदविला की भविष्यात पाणी खराब झाल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार?

**त्यावेळी सदस्य यांनी** सांगितले की यासाठीच आता नविन धोरणामुळे सांडपाण्याचा एकही थेंब प्रकल्पाबाहेर सोडता येणार नाही. उत्पादनासाठी जो पाण्याचा उपसा होतो, त्याचे प्रमाणही कमी होईल. त्यासाठी झेडएलडी हे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

**श्री ढवळे यांनी** परत आक्षेप नोंदविला की आम्ही या कंपनीचे स्वागत करतो. तरी आम्ही ज्या गोष्टी भोगत आहोत, त्याबाबत शासनाने, मप्रनि मंडळाने पुढील कार्यवाही करावी.

**सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी** लेखी सूचना, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

**सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी** सांगितले की बैठकीच्या सुरवातीस आयोजकांनी सांगितले आहे की सदरहू जनसुनावणी ही स्थानिक लोकांच्या प्रस्तावित प्रकल्पाविषयी असणारे विचार, सूचना, आक्षेप यांच्यासाठी असून ते शासनास सादर करण्यासाठी आहे. बैठकीच्या सुरवातीस आयोजक यांनी प्रतिपादन केले की ही समिती फक्त लोकांचे मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे, नाकारणे किंवा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. आपण जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेप यांची इतिवृतात नोंद घेण्यात येईल.

त्यानुसार येथे बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली असून त्याचा इतिवृतात समावेश करणात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत

उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण मुल्यांकन अहवाल पर्यावरण, वने व हवामान बदल विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली यांना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे सादर करावयाचा असतो. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते.

सदस्य यांनी उपस्थितांना परत त्यांच्या प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही सूचना, आक्षेप असल्यास त्या उपस्थित करण्याचे आवापन केले. उपस्थितांकडूना कोणताच प्रतिसाद नव्हता.

सदस्य पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सर्व उपस्थितांचे बैठकीस उपस्थित राहिल्याबद्दल आभार मानले व मा. अध्यक्षांच्या वतीने जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले,

मा. अध्यक्ष यांचे आभार मानून जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

जनसुनावणी पूर्वी व जनसुनावणी दरम्यान लेखी सूचना/आक्षेप प्राप्त झालेले नाहीत.

**(प्रशांत भोसले)**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर
जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
रायगड-१,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण
मंडळ,
नवी मुंबई

**(जयवंत हजारे)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर
जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी-रायगड
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण
मंडळ,
नवी मुंबई

**(संदेश शिर्के)**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, रायगड,
जिल्हा - रायगड